**आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई, यांचे कार्यालय**

दुसरा मजला, जुने जकात घर, शहिद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई – ४०००२३.

**Fax No. 22662370 * Tel. No. Jt. Commr. 22620238 * Dy. Commr. 22665569**

**E-mail – commstateexcise@gmail.com**


# परिपत्रक

क्रमांक – डिईटी ११२०२१ / १३० / नऊ मुंबई, दिनांक १९ जुलै, २०२१.

या विभागातील सर्व विभागीय उपआयुक्त व अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क यांना या कळविण्यात येते की, सध्या राज्यासह संपुर्ण जगात कोव्हीड-१९ या महामारीने थैमान घातल्यामुळे त्याच्या प्रसारास आळा घालण्यासाठी वेळोवेळी राज्यात लॉकडॉउन घोषित करुन अत्यावश्यक सेवा वगळता इतर सर्व व्यापार, उद्योगाची केंद्रे, दुकाने बंद ठेवली जातात. त्याचाच परिणाम म्हणुन राज्यातील सर्व प्रकारच्या मद्यविक्री अनुज्ञप्ती वेळोवेळी बंद करण्यात आलेल्या असल्यामुळे तसेच मद्यविक्रीच्या वेळा सुध्दा बदलल्याने बहुतांश ठिकाणी अवैध मद्यविक्री मध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याचे, या विभागाने तसेच पोलीस विभागाने नोंदविलेल्या गुन्ह्यांवरुन दिसून आले आहे.

हातभट्टी, परराज्यातून येणारे मद्य, बनावट मद्य, कर चुकविलेले मद्य इ. प्रकारच्या अवैध मद्य धंद्यावर पाळत ठेऊन त्यावर कठोर कारवाई करण्याची जबाबदारी संबंधित कार्यक्षेत्रातील अधिकारी / कर्मचारी यांचेसोबत जिल्हा अधीक्षकांचीही आहे. नजिकच्या काळात राज्यातील वेगवेगळ्या जिल्हयात जिल्ह्याबाहेरील अधिकाऱ्यांनी अवैध मद्य / मद्यार्क / ताडी इ. बाबतचे गंभीर गुन्हे नोंदविले आहेत. यावरुन संबंधित जिल्हयातील अधिकारी / कर्मचारी हे त्यांच्या विभागात पुर्ण क्षमतेने काम करीत नसल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे, जी बाब गंभीर आहे. अशा प्रकारच्या अवैध व्यवहारामध्ये शासन महसूलाचे नुकसान तर होतेच तसेच सामाजिक आरोग्यही धोक्यात येण्याची शक्यता अधिक असते. याबाबत मा. उपमुख्यमंत्री महोदय यांनी बैठकीत तीव्र खेद व्यक्त करुन अशा प्रकारच्या मद्य / मद्यार्क / ताडी इत्यादीच्या अवैध व्यवहाराविरुध्द कठोर कारवाई करुन ते तात्काळ कायमस्वरुपी बंद होतील अशी उपाययोजना करण्याचे निर्देश देऊन असे अवैध व्यवहार भविष्यात जिथे आढळतील त्या संबंधित जिल्हा अधीक्षकांना याबाबत थेट जबाबदार धरून त्यांच्यासह संबंधित अधिनस्त अधिकारी / कर्मचाऱ्यांवर त्याचवेळी कठोर कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत. त्याअनुषंगाने खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहे.

सर्व संबंधित विभागीय उपआयुक्त व अधीक्षकांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व संबंधीत अवैध धंद्याविरुध्द तात्काळ कठोर पावले उचलावीत. संबंधित विभागीय उपआयुक्त व अधीक्षक यांनी आपल्या कार्यक्षेत्रात स्वत: सतर्क राहुन तसेच अधिनस्त अधिकारी / कर्मचाऱ्यांना जागृत करुन सर्व हातभट्टी विक्री केंद्र कायमस्वरुपी बंद करण्यासाठी योग्य ती उपाययोजना करावी. तसेच यासाठी स्थानिक पोलीस विभागाचेही योग्य ते सहकार्य घ्यावे.

तसेच जिल्हयातील संशयीत व्यक्ती / आरोपी यांचेवर पाळत ठेवुन आपल्या जिल्हयात कुठल्याही प्रकारची बनावट मद्य निर्मिती / विक्री होणार नाही याची पुर्णपणे दक्षता घ्यावी. आपापल्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या अवैध मद्यावर १००% अंकुश ठेऊन असे मद्य परजिल्हयातुन किंवा परराज्यातुन येत असल्यास त्यावर कठोर कारवाई करण्यात येऊन व अशा अवैध धंद्यात गुंतलेल्या आरोपीविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी कायदा, १९४९ मधील कलम ९३ तसेच MPDA कायद्याखाली कारवाई करण्याची दक्षता घ्यावी. याबाबत वेळोवेळी सुचना देण्यात आलेल्या आहेत त्याचे काटेकोरपणे पालन करावे.

या विभागाची अनुज्ञप्ती न घेता अवैधरित्या मद्यविक्री करणाऱ्या हॉटेल व ढाब्यावर कठोर कारवाई करावी तसेच अवैध मद्यविक्री करणाऱ्या आपल्या कार्यक्षेत्रातील हॉटेल, ढाब्याचे मालक व जागामालक यांचेवर प्रामुख्याने गुन्हा नोंदविण्याची दक्षता घ्यावी.

आपापल्या कार्यक्षेत्रातील कुठल्याही निर्माणीमधुन कर चुकविलेले मद्य / मद्यार्कसाठा कुठे आढळुन आल्यास त्या संबंधित प्रभारी अधिकाऱ्यांसह अधीक्षकांना जबाबदार धरण्यात येईल याची नोंद घ्यावी.

तसेच जिल्हयाच्या कुठल्याही अनुज्ञप्तीमधुन कोणत्याही परिस्थितीत विना वाहतुक पास मद्याचा साठा किंवा विक्री होणार नाही यासाठी आवश्यक ती उपाययोजना करुन योग्य ती खबरदारी घ्यावी. तसेच विना वाहतुक पास मद्यसाठ्याचा गुन्हा जिल्ह्याबाहेरील अधिकाऱ्यांनी नोंदविल्यास, संबंधित विभागाचे अधिकारी / कर्मचाऱ्याससह संबंधित जिल्हा अधीक्षकही थेट जबाबदार ठरुन कारवाईस पात्र ठरतील. आपल्या अधिनस्त कार्यक्षेत्रातुन अवैधरित्या मद्य / मद्यार्काचा साठा, वाहतुक, विक्री, बाळगणुक होणार नाही यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्याची दक्षता घ्यावी.

आपापल्या कार्यक्षेत्रात कुठेही अवैधरित्या ताडी निर्मिती, वाहतुक, विक्री वा साठवणुक इ. अवैध ताडी व्यवहार आढळुन आल्यास संबंधित अधिकाऱ्यांसह अधीक्षकांनाही जबाबदार धरण्यात येऊन कारवाई करण्यात येईल.

उपरोक्त प्रमाणे आपापल्या कार्यक्षेत्रात सर्व संबंधीत अधिकारी / कर्मचाऱ्यांना याबाबत सचेत व सतर्क करुन त्यांनी अशा प्रकारे त्यांच्या कार्यक्षेत्रात कोणत्याही परिस्थिती अवैध मद्य / मद्यार्क / ताडी इत्यादी निर्मिती, वाहतुक, साठवणुक वा विक्री होणार नाही यासाठी महाराष्ट्र दारुबंदी कायदा, १९४९ व त्या अंतर्गत वेगवेगळे नियम, आदेश, निर्देश इत्यादीची कठोर अंमलबजावणी करुन अशा प्रकारच्या अवैध मद्य / मद्यार्क / ताडी व्यवहाराविरुध्द व त्यात गुंतलेल्या व्यक्तींविरुध्द जेथे असे व्यवहार होतात त्या जागामालकांविरुध्द तसेच अशा व्यवहारात सहकार्य करणाऱ्या, आर्थिक भाग-भांडवल पुरवणाऱ्या, कच्चा माल पुरवणाऱ्या इत्यादी संबंधितांवर कठोर कारवाई करण्याची दक्षता घ्यावी.

याद्वारे पुन्हा सर्व विभागीय उपआयुक्त व अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क यांना निर्देश देण्यात येत आहेत की, यापुढे कधीही जिल्ह्याबाहेरील अधिकाऱ्यांनी किंवा इतर विभागातील अधिकाऱ्यांनी अशा प्रकारच्या अवैध मद्य / मद्यार्क / ताडी इत्यादीबाबतचा गंभीर गुन्हा त्यांच्या कार्यक्षेत्रात उघडकीस आणल्यास संबंधित विभागाच्या अधिकारी / कर्मचाऱ्यांसोबत संबंधित जिल्हा अधीक्षकांनाही थेट जबाबदार धरुन त्यांच्याविरुध्द कठोर कारवाई करण्यात येईल.

सदर निर्देशाच्या अंमलबजावणीसाठी वेगवेगळी पथके निर्माण करुन राज्यातील वेगवेगळ्या ठिकाणी कारवाईसाठी पाठविण्यात येणार असून संबंधीत पथकाने जर वर नमुद प्रमाणे अवैध मद्य / मद्यार्क / ताडी इ. चा गंभीर गुन्हा उघडकीस आणला तर संबंधित जिल्हा अधीक्षकांना थेट जबाबदार धरुन त्यांच्यासह संबंधित अधिनस्त अधिकारी / कर्मचाऱ्यांवर तात्काळ कठोर कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदर परिपत्रक सर्व विभागीय उपआयुक्त व अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क यांना ई-मेलने पाठविण्यात येत असून याची तात्काळ नोंद घेऊन आवश्यक ती उपाययोजना करावी.

( कांतीलाल उमाप )
आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.